**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

**दिनांक २२.०४.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दिनांक २१.०४.२०२६ रोजी अवैध दारुविक्री करणा—यांविरुध्द धडक मोहीम. तसेच, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २१.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, अवैध दारुविक्री करणारे इसमांविरुध्द विशेष मोहीम राबवली. सदर मोहीमेमध्ये अवैध दारुविक्री करणारे इसम, आस्थापना, ओपन रुफटॉप हॉटेल्स चेक करण्यात आले व चेकींग दरम्यान अवैध दारुविक्री करणारे तसेच सार्वजनीक ठिकाणी अवैधरित्या दारू पिनारे ईसमांवर कारवाई करुन ३३ केसेसमध्ये ३४ ईसमांवर गुन्हे दाखल करून, एकूण ८०,०७०/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. सदर मोहीमेदरम्यान हद्यपार आरोपी, जेल रिलीज आरोपी व हत्यार कायदयातील आरोपींना चेक करण्यात आले.

तसेच, एन.डी.पी.एस. कायद्यान्वये ०२ केसमध्ये ०२ इसमांवर कारवाई करून एकुण ५,५९,८००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जुगार कायद्यान्वये ०२ केसेसमध्ये ०४ ईसमांवर कारवाई करून एकुण ३,०१५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०५७ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,५६,०५०/—रू. तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आली असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) अजनी पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २१.०४.२०२६ चे २१.०३ वा. सुमारास, अजनी पोलीसांचे तपास पथक हे पेट्रोलींग करीत असतांना, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत अविनाश ग्राऊंड, आरपीएफ कॅन्टीन समोरील मोकळ्या जागेत, सापळा रचून पांढऱ्या रंगाची ब्रिझा गाडी क्र. एम. एच. १४ एच.के. ५३०७ चे चालकास घेराव टाकून थांबविले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने आपले नाव शेख वसीम शेख हबीब, वय ३६ वर्षे, रा. प्लॉट नं. २९, न्यु नरसाळा रोड, बॅंक ऑफ इंडीयाजवळ, दिपनगर, हुडकेश्वर असे सांगितले. पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टचे खिश्यात एका झिपलॉक पन्नीमध्ये ०४ ग्रॅम एम.डी. पावडर मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन, व

ब्रिझा कार असा एकुण ५,५८,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वतःचे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २२(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपीविरूध्द पोलीस ठाणे अजनी येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. शिवाजीराव राठोड, अपर पोलीस आयुक्त (दक्षीण प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती रश्मीता राव पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ४), मा. नरेंन्द्र हिवरे सहा. पोलीस आयुक्त (अजनी विभाग) यांचे मार्गदर्शानाखाली, वपोनि. नितीनचंद्र राजकुमार, पोनि.गुन्हे प्रभाकर कवाळे, पोउपनि. संतोष वाघमारे, पोहवा. शालीराम शेंडे, पोअं. रोशन वाडीभस्मे, प्रविण व अश्वीन यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे सिताबर्डी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २१.०४.२०२६ चे १२.१५ वा. चे सुमारास, फिर्यादीचा भाऊ नामे रितेश पुंडलीकराव सातपूते, वय ४५ वर्षे, रा. गल्ली नं. ०६, प्रेमनगर, झेंडा चौक, ईतवारी, नागपूर हे त्यांचे मोटारसायकल क्र. एमएच ३१ सी.टी.२१२३ ने पोलीस ठाणे सिताबर्डी हद्दीत, प्रिन्स सावजी भोजनालयाचे विरूध्द बाजूने, मेट्रो पिल्लर क्र. २१५ चे मधोमध रोडवरून जात असतांना, ई बस वाहन क्र. एमएच. ४० डीसी. २६३१ चा चालक नामे शेख सरवर शेख सगीर, वय २८ वर्षे, रा. हिवरे ले—आऊट, वाठोडा रोड, नागपूर याने त्याचे ताब्यातील बस भरधाव वेगाने व निष्काळजीपणे, धोकादायकरित्या चालवून फिर्यादीचे भावाचे दुचाकीला मागून धडक दिल्याने ते गंभीर जखमी झाले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, उपचारा दरम्यान डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी फिर्यादी श्याम पुंडलीकराव सातपूते, वय ४५ वर्षे, रा. गल्ली नं. ०६, प्रेमनगर, झेंडा चौक, ईतवारी, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे सिताबर्डी येथे पोउपनि. भालेराव ७७३८६७५५५७ यांनी आरोपी बस चालकाविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे पारडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

पोलीस ठाणे पारडी हद्दीत, पोवार कॉलोनी, पुनापुर नाल्याजवळ, पारडी, नागपुर येथे फिर्यादी लोकेश संजय शरणागत, वय २५ वर्षे, रा. प्लॉट नं. १७१, नवीन नगर, पारडी, यांचे न्यु संजय इलक्ट्रीक फेब्रिकेशन नावाचे दुकान आहे. दिनांक २०.०४.२०२६ चे २२.३०० वा. ते दिनांक २१.०४.२०२६ चे ०६.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी हे आपले दुकान बंद करून शटरला कुलुप लावुन घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटर वाकवुन, आंत प्रवेश करून, दुकानात ठेवलेले वेगवेगळ्या कंपनीचे, वेगवेगळ्या एमएमचे एकुण १२४ वायर बंडल व एक कुलर असा एकुण किंमती ३,०२,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पारडी येथे सपोनि. गजानन कंकाळ ९०४९५००३९६ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

(ईतर)

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :-**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर व प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४४१७/ २००७ | कलम ८२ सी.आर.पी. सी. प्रमाणे | १) प्रकाशकुमार संतकुमार महीलांगे, २)अशोक शेरसिंग ईनावत, दोन्ही रा. चिखली वस्ती, म्हाडा वस्ती क्वार्टर नं. २०२, कळमना, नागपूर | ०८.०५.२०२६ |

स्वा/-

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**